RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# मूल्याधारित उच्च शिक्षण – काळाची गरज

**डॉ. वर्षा महेश माने**
सहाय्यक प्राध्यापक
आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सातारा.

मूल्य म्हणजे शिक्षण. शिक्षण म्हणजे मूल्य. मूल्य आणि शिक्षण हयांचा परस्परसंबंध आहे. आजच्या शिक्षणाची आशयसंपन्नता सर्वांगिण करण्यासाठी मूल्याशिक्षणाची आवश्यकता आहे. मूल्यशिक्षणाची वलये व्यक्ती, समाज, राष्ट्र, विश्व अशी विस्तारीत जातात. म्हणजेच मूल्यशिक्षणाची सुरूवात व्यक्तीपासून होते. शिक्षकाच्या दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांच्या माध्यमातूनच शिक्षकाला उद्याचा समाज , उद्याचे राष्ट्र घडविता येते. आपल्या विद्यार्थ्यांमध्ये मूल्ये रूजावित व शिक्षणाच्या माध्यमातून त्याला मूर्त रूपा द्यावे यासाठी मूल्याधिष्ठित शिक्षण आज महत्त्वाचे ठरत आहे. म्हणून मूल्यशिक्षणाची उदिदष्टये शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यासाठी निश्चित करणे गरजेचे आहे.

**शिक्षकांची उद्दिष्टे**

1) मूल्यशिक्षणासाठी पोषक वातावरण निर्मिती करणे.
2) स्वतःचे वर्तन मूल्याधिष्ठित ठेवणे.
3) अध्यापन व अभ्यासपूरक उपक्रमांच्या माध्यमांतून त्यांना प्रोत्साहित करणे.
4) विद्यार्थ्यांना चुकीच्या / वाईट गोष्टींपासून सावध करणे.
5) इतरांच्या मूल्याधिष्ठित वर्तनाचा आदर करण्याची सवय स्वतःला व विद्यार्थ्यांना लावणे.

**विद्यार्थ्यांची उद्दिष्टे**

1) मूल्यांना पोषक असे वातावरण स्वतःशी संबंधित असलेल्या परिसरात राखणे.
2) अभ्यासपूरक उपक्रमांच्या माध्यमातून मूल्ये आत्मसात करून त्यानुसार वागणे.
3) वाईट गोष्टींपासून जाणीवपूर्वक सावध राहणे.
4) इतरांच्या मूल्याधिष्ठित वर्तनाचा आदर करण्याची सवय स्वतःला लावणे.
5) स्वतःचे वर्तन जाणीवपूर्वक विकसित ठेवणे.

मूल्यानुभव ही आपली आणि आपल्या विद्यार्थ्यांची दररोजची गरज आणि मागणी असते. त्यासाठी आमच्या आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सातारा या महाविद्यालयामध्ये दैनिक मूल्यशिक्षण परिपाठ आम्ही घेत असतो. तसेच शालेय अनुभव कार्यक्रमामध्ये शालेय परिपाठ घेतो. सद्‌गुण आत्मसात करण्यासाठी पोषक व पूरक वातावरण दैनिक मूल्यशिक्षण परिपाठाद्वारे केले जाते.

**प्रार्थनेच्या वेळी केले जाणारे उपक्रम**

टोल वाजताच सर्व विद्यार्थी परिपाठाच्या ठिकाणी एकत्र येऊन आपआपल्या नियोजित जागी उभे राहतात. यातून एकत्रीकरण, स्वयंशिस्त मूल्य दिसून येते.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

**राष्ट्रगीतः–** प्रार्थना उपक्रमाचा प्रारंभ राष्ट्रगीताने सुरू होतो. यातून राष्ट्रप्रेम , राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्रभक्ती या राष्ट्रीय मूल्यांचा उत्कट प्रत्यय येतो.

**कर्मवीर गीतः–** त्यानंतर सर्वजण एकासुराने, लयबद्धतेने, तन्मयतेने संगीतासह कर्मवीर गीत म्हणतात. देहातून श्रम, सहकार्य यासारख्या मूल्यांची जाणीव होते.

**सुविचारः–** फलकावर लिहिलेल्या व स्पष्टीकरण करून सांगितलेल्या सुविचारातून सद्वर्तनाची प्रेरणा मिळते.

**दिनविशेषः–** आजच्या दिनांकाला घडलेलेल्या महत्त्वाच्या घटनांचा उल्लेख भावविश्व समृध्द करतो.

**विद्यार्थी कथनः–** दररोज डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या पुस्तकातील एका परिच्छेदाचे वाचन केले जाते. यामधून पर्यावरण प्रेम, अंधश्रध्दा निर्मूलन, वैज्ञानिक दृष्टिकोन यांची रूजवणूक होते.

**अभिनंदन/कौतुकः–** विविध उपक्रमांमध्ये प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचे कौतुक केल्यामुळे इतरांना प्रेरणा, जिद्द, महत्त्वकांक्षा इ. गुण निर्मितीसाठी होते.

**अध्यापन पध्दतीतून मूल्य रूजवणूक**

आपल्या विद्यार्थ्यांमध्ये मूल्यांची रूजवणूक आपल्याला अध्यापनाच्या निरनिराळया पध्दती, तंत्रे, प्रतिमाने यांच्या माध्यमातून केली जाते.

विद्यार्थ्यांमध्ये मूल्यांची रूजवणूक करायची हे कृतीत येण्यासाठी पुढील कृती केल्या जातात.

1) सर्वप्रथम आपल्या विषयामध्ये कोणकोणती मूल्ये अंतर्भूत आहेत. याचा सुरूवातीला वार्षिक नियोजन करताना शोध घेतला जातो.
2) मूल्याचा शोध घेताना पाठ काळजीपूर्वक वाचला जातो. निर्धारीत दहा मूल्यांशिवाय आणखी काही मूल्ये पाठयघटकांत असतात. एकाच पाठयघटकात सगळीच मूल्ये असतील असे नाही.
3) पाठातील मूल्यांचा शोध घेतल्यानंतर पाठाचे टाचण तयार केले जाते.
4) पाठातील घटकांचे अध्यापन करताना मूल्यांची रूजवणूक करण्यासाठी क्रमाने नेमके काय काय करायला हवे, अध्यापनाला कोणकोणत्या उपक्रमांची, साधनांची जोड द्यावी, मूल्ये कितपत रूजतील हे पाहण्यासठी मूल्यमापन कसे करावयाचे याचा विचार केला जातो.
5) मूल्यशिक्षणाच्या अनुषंगाने उद्दिष्टे निश्चित करतात.
6) मूल्यानुभव प्रत्यक्ष मिळावा म्हणून शिक्षक पाठांतर्गत एखादा उपक्रम निश्चित करतात. त्यामुळे पाठाची आणि पर्यायाने मूल्यांची परिणामकारकता वाढते.
7) अगदी विद्यार्थी भूमिकापालनही करतात. यामध्ये पाठपरत्वे नावीन्य असते.
8) काही वेळा अप्रत्यक्ष अनुभवांची योजना ही पाठांतर्गत केली जाते.
9) यासर्व गोष्टींचे मूल्यमापन केले जाते व निरीक्षणाद्वारे अनुमान काढले जाते. सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन केले जाते.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

10) शिक्षकाने पाठाचा घटक व पाठातून रूजवायची मूल्ये या गोष्टींचा विचार करून योग्य अध्यापन पध्दती व पाठाच्या पद्‌बंधाची निवड केली पाहिजे. हे मात्र लक्षात पाहिजे.

**शैक्षणिक उपयुक्तता**

1) मूल्यांची रूजवणूक करता येते.
2) मूल्यांची ओळख होते.
3) वाईट मार्गापासून सावध राहता येते.
4) मूल्ये व 'स्व' यांच्यामधला भावबंध समजतो.
5) मूल्य रूजवणूकीच्या गरजेची जाणीव होते.
6) जीवनविषयक सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होतो.

- **मूल्य रूजवणूक : विद्यार्थ्यांची भूमिका**

1) **मूल्यांची ओळखः–** मूल्यांचा ध्यास असण्यासाठी मूल्यांची ओळख असायला हवी. मूल्य म्हणायचे कशाला, मूल्ये कोणती आहेत, चांगले काय आहे. त्या चांगल्यामुळे आपले किती आणि कसे चांगले होणार आहे हे विद्यार्थ्याला कळायला हवे.
2) **मूल्यांच्या स्त्रोताची ओळखः–** ज्या मूल्यांमुळे आपले चांगले होणार आहे. त्या मूल्यांचे स्त्रोत कोणकोणते आहेत, हेही विद्यार्थ्याला कळायला हवे.
3) **अवमूल्यांची व अवमूल्यांचा स्त्रोतांची स्त्रोतांची ओळख सावधानतेसाठीः–** मूल्यांची रूजवणूक सोपी आणि सहज व्हावी. हयासाठी विद्यार्थ्याला अवमूल्यांची व अवमूल्यांच्या स्त्रोतांची जाण असायला हवी. अवमूल्यांचे परिणामही माहिती असायला हवेत.
4) **मूल्ये आणि ' स्व – हयांच्यामधला भावबंधः–** कोणता मार्ग चांगला आहे हे जसे कळायला हवे, तसे हा चांगला मार्ग आपल्यासाठी आहे हेही कळायला हवे.
5) **उणिवांची जाणीवः–** विद्यार्थ्याला हेही कळायला हवे, त्याच्या व्यक्तिमत्वात कोणकोणत्या उणिवा आहेत. उणिवांची जाणीव नसली की उणिवा वाढत जातात. संख्येने वाढत जाणा–या उणिवा आकारानेही मोठया होत जातात. अशा उणिवा नंतर दूर करता येत नाहीत.
6) **सकारात्मक दृष्टिकोनः–** मूल्य रूजवणूकीला आणखी एक अडसर म्हणजे मूल्य रूजवणूकीच्या संदर्भातला नकारात्मक दृष्टिकोन. जीवन विषयक अनुभव सहजासहजी मिळत नसतो. त्यासाठी सहेतुक प्रयत्न असावे लागतात.
7) **उपक्रमात सहभागः–** गुणांसाठी नव्हे तर सद्‌गुणांसाठी उपक्रमांत सहभागी झाले पाहिजे हे विद्यार्थ्याने लक्षात घेतले पाहिजे.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

- **मूल्य रूजवणूक : शिक्षकाची भूमिका**

प्रत्येक शिक्षकाला सुसंवाद साधायला आवडतो. जो सुसंवादी असतो तोच तर शिक्षक असतो. अध्यापन म्हणजे शिक्षकाने विद्यार्थ्यांशी करावयाचा सुसंवाद होय. सुसंवाद हे तर मूल्य आहे.

1) **मूल्यशिक्षण आणि शिक्षण हया एकात्म बाबी** – प्रत्येक शिक्षक हा मूल्यशिक्षक असल्यामुळे शिक्षकाला त्याची अध्यापनशीलता, उपक्रमशीलता वजा करता येत नाही. अध्यापनशीलता, उपक्रमशीलता हीच तर शिक्षकाची ओळख असते.
2) **विद्यार्थ्यांकेंद्री भूमिका** – शिक्षकाचे प्रत्येक सूत्र विद्यार्थ्यांसाठी असावे. त्यासाठी शिक्षकाची भूमिका विद्यार्थीकेद्री हवी.
3) **आशावादी दृष्टिकोन** – सगळे शिक्षक मूल्यांचे असल्यामुळे सगळया शिक्षकांनी मूल्य रूजवणूकीच्या संदर्भात आशावादी असायला हवे.
4) **मूल्यांचा संग, व्यासंग** – मूल्य रूजवणूकीचा ठाम निर्धार कृतीत परिणत होण्यासाठी प्रत्येक शिक्षकाने मूल्यांचा संग आणि व्यासंग बाळगायला हवा.
5) **अभ्यासक्रमाची अंमलबजावणी** – परहिताच्या ध्यासातून, विद्यार्थ्यांमध्ये मूल्य रूजवणूक करण्याच्या ध्यासातून शिक्षकाने अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे. पाठयक्रमातला प्रत्येक पाठ हा मूल्यपाठ आहे. पाठयक्रमातला प्रत्येक धडा मूल्यांचा बोध देणारा आहे. ही शिक्षकाची भूमिका असायला हवी.

## संदर्भ

कुंडले म. बा. – शैक्षणिक तत्वज्ञान आणि शैक्षणिक समाजशास्त्र

पारसनिस न. रा. – उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण

मूल्यशिक्षण – वर्तमानपत्रातील कात्रणे

मूल्यशिक्षण– कार्यपुस्तिका